सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
**पोलीस अधीक्षक, बीड यांचे कार्यालय,**
जिल्हा रुग्णालयाजवळ, बार्शी रोड, बीड - ४३१ १२२.
ई मेल - दुरध्वनी क्रमांक ०२४४२ -२२२३३३ फॅक्स क्र.०२४४२-२२१३३३
ps.corspbr.beed@mahapolice.gov.in

---

जा.क्र.पशा-४/ पो.कॅन्टीन व मेस
जाहिरनामा/२०२३/
पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड
दि. /०१/२०२३

**** जाहिरनामा ****

पोलीस अधीक्षक, बीड कार्यालय परिसरात पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे साठी चहा नाष्टा व जेवणासाठी मेस/कॅन्टीन खालील अटी व शर्तीनुसार जास्तीत जास्त दराचे निविदा सादर करणारे पोलीस अंमलदार यांचे जवळचे नातेवाईक (मुले-मुली, पती-पत्नी, भाऊ-बहीण) ज्यांच्याकडे उपहागृहाचा अधिकृत परवाना आहे त्यांना चालविण्यास प्राधान्य देणे आहे. सदर अटी व शर्ती नुसार चालविण्यास तयार असणारे पोलीस कर्मचारी यांचे जवळचे नातेवाईकांनी त्यांचे अर्ज पोलीस अधीक्षक यांचे नावे बंद पॉकिटात दि.०६/०२/२०२३ ते दि. १०/०२/२०२३ रोजी पर्यंत सकाळी ११ वाजेपासुन ते सायंकाळी ०५ वाजेपावेतो कार्यालयीन वेळेत समक्ष या कार्यालयातील पोलीस निरीक्षक, मानव संसाधन विभाग शाखा येथे दाखल करावीत, मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत: -**

१) मेस ॲन्ड कॅन्टीनमध्ये दैनंदिन चहा, नाष्टा व जेवणाचा दर्जा स्वच्छ व ताजा व उत्तम ठेवतील. बाहेरील हॉटेलच्या दरापेक्षा अन्न पदार्थाचे दर जास्त ठेवणार नाहीत.
२) मंजुर दरापेक्षा जास्त दराने चहा/नाष्टा/विक्रि करणार नाही.
३) मेस व कॅन्टीनमधुन विक्री होणारे पदार्थ व चहा वगैरेची ग्राहकांकडील वसुली ही त्यांनी त्यांचे वैयक्तीक जबाबदारीवर करावी. पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना पुरविण्यात आलेल्या अन्न पदार्थाच्या रकमेची वसुली पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथुन करण्यात येणार नाही. हे कार्यालय त्यासाठी कोणत्याही कारणास्तव जबाबदार राहणार नाही.
४) मेस ॲन्ड कॅन्टीन व त्यामधील साहित्य ज्या स्थितीत देण्यात आलेले आहे ते करार संपताच मुळ स्थितीत परत करावे लागेल. तुट/फुट, हानी झाल्यास त्यावेळचे स्थितीनुसार योग्य ती नुकसान भरपाई दयावी लागेल.
५) मेस ॲन्ड कॅन्टीन इमारत व परिसर जागेची स्वच्छता त्यांना स्वत: राखावी लागेल. अस्वच्छता राहणार नाही यांची दैनंदिन काळजी घ्यावी लागेल.
६) या कार्यालयास काही कारणास्तव कॅन्टीन इमारतीचा करार पुर्ण होण्यापुर्वी आवश्यकता भासल्यास सुचना मिळताच दहा दिवसाचे आत कॅन्टीन रिकामे करण्याची हमी देतील, असा करारनामा देण्यात यावा.
७) कॅन्टीन चालु करण्यापुर्वी ५०,०००/- डिपॉझीट भरणा करावा.
८) कॅन्टीनचे दरमहा भाडे प्रत्येक महिण्याचे दरमहा मुदतीत ५ तारखेच्या आत जमा करुन तसे कळवतील भाडे ३ महीना थकीत राहिल्यास कॅन्टीन करार रद्द करण्यात येईल व कॅन्टीन तात्काळ रिक्त करुन घेण्यात येईल.
९) कॅन्टीन इमारत व साहित्याचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन देतील.
१०)कॅन्टीन ॲडव्हान्स किमान ५०,०००/- भरणा करावा.

११) कॅन्टीनमध्ये दररोज चहा, नाष्टा व जेवण ठेवतील. कॅन्टीन सकाळी ०६.०० ते २२.०० वाजे पर्यंत चालु ठेवुन सेवा पुरवतील.

१२) कॅन्टीनमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार अथवा कोणीही मद्यप्राशन करणार नाही याची दक्षता घेतील. किंवा तशी परवानगी देणार नाहीत.

१३) मेस व कॅन्टीन मधील अन्न पदार्थाचे दर पो.नि. मानव संसाधन विभाग यांचेशी संपर्क करुन पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेनंतर ठरवले जातील.

१४) कॅन्टीन चालक व इतर कर्मचारी यांचे चारित्र्य चांगले व त्यांचे विरुध्द कोणताही गुन्हा किंवा इतर प्रतिकुल बाबी नसाव्यात.

१५) मेस मध्ये अधिकारी वर्गासाठी एक टेबल राखीव ठेवण्यात यावा.

१६) अन्न व औषध प्रशासन यांचेकडील अन्नपदार्थाबाबत नियमाप्रमाण व योग्य वेळेत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील व परवानगाधारक असावेत..

१७) अन्न पदार्थाचे दर खालील प्रमाणे असावेत.अर्जदाराने अर्जामध्ये खालील पदार्थाचे दर नियमाप्रमाणे देण्यात यावेत. आणि ते बंद पॉकिटमध्ये असावेत.

| अ.क्र | पदार्थाचे नाव | रुपये पैसे |
|---|---|---|
| ०१ | चहा | ०८/- |
| ०२ | कॉफी | १२/- |
| ०३ | पोहे | १५/- |
| ०४ | शिरा | २०/- |
| ०५ | उपमा(उपीट) | २०/- |
| ०६ | दही धपाटा | ३०/- |
| ०७ | मटकी | २०/- |
| ०८ | भजे | १५/- |
| ०९ | पुरी भाजी | ३०/- |
| १० | शाबुदाना खिचडी | ३०/- |
| ११ | नायलोन चिवडा | १०/- |
| १२ | जेवन (दोन भाजी, डाळ, पोळी, भात व इतर) | ७५/- |
| १३ | भात वरण | ३०/- |
| १४ | दही वाटी | १०/- |
| १५ | प्रति महिना दोन वेळेस जेवन | १६००/- |

१८) परिपत्रकराप्रमाणे दिलेल्या अन्नपदार्थाचे दर कोणत्याही परिस्थितीत एका वर्षात बदलता येणार नाहीत.

**(नंदकुमार ठाकूर )**
पोलीस अधिक्षक ,बीड.

**प्रति**,पोलीस निरीक्षक मानव संसाधन विभाग पो.अ.का.,बीड.